आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - संध्याकाळी ८.०५ वाजता

२४ मार्च २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रासह देशभर होळीचा सण उत्साहात साजरा, राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांच्या देशवासीयांना शुभेच्छा /संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी लेहमधे साजरी केली सैनिकांसोबत होळी
- भारतीय भांडवल बाजारात परदेशी गुंतवणुकदारांच्या गुंतवणुकीत या महिन्यात लक्षणीय वाढ
- माजी हवाई दल प्रमुख आर के एस भदौरिया यांचा भाजपात प्रवेश
- ईशान्य भारत, पश्चिम बंगालचा काही भाग आणि सिक्किममध्ये आजपासून मंगळवारपर्यंत वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत जयपूर इथं झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सचा लखनौ सुपर जायंट्सवर २० धावांनी विजय

**<><><><><>**

होळीचा सण आज देशभर मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. उत्तरेकडच्या राज्यांमध्ये होलिकात्सवाचा वेगळाच उत्साह पाहायला मिळतो. मुंबई पुण्यात असलेल्या उत्तर भारतीयांसाठी भारतीय रेल्वेने अनेक विशेष रेल्वेगाड्या चालवल्या आहेत.

पंजाब, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशासह देशाच्या सर्वच भागात होलिकात्सवाचा उत्साह दिसून येत आहे. श्रीलंकेत काल विवेकानंद सांस्कृतिक केंद्राच्या वतीने होलिकोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये अनेक श्रीलंकन नागरिकही सहभागी झाले होते. भारतातील सिंगापूरच्या दूतावासानेही भारतीयांना होळीच्या शुभेच्छा

दिल्या आहेत. सिंगापूरचे राजदुत सिमोन वॉंग यांंनी एक्सवरुन या शुभेच्छा दिल्या असून आपल्या पोस्टमध्ये उत्तर प्रदेशातील बारसाना इथल्या होळीचे काही फोटोही शेअर केले आहेत. देशभरात उद्या होणाऱ्या धुळवडीचीही जोरदार तयारी पाहायला मिळत आहे.

महाराष्ट्रात कोकणात कालपासूनच होळीच्या पालख्या आणि होलिका दहनाची तयारी सुरु झाली आहे. अनेक चाकरमानी होळीनिमित्त आपापल्या गावी गेले आहेत. त्यांच्यासाठी कोकण रेल्वेनं आणि राज्य परिवहन मंडळानं खास गाड्याही सोडल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागरिकांना होलिकादहन आणि उद्याच्या धुळीवंदनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती दौपदी मुर्मु यांनी देशवासीयांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. होळी हा उत्साहाचा आणि आनंदाचा सण असून होळी लोकांच्या जीवनात सकारात्मकता उत्साह निर्माण करत असल्याचं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. देशातील विविधतेतही परस्पर प्रेम बंधुभाव आणि एकतेचा संदेश देणारा हा सण असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे की हा रंगांचा सण प्रत्येकाच्या जीवनात नवी उर्जा आणि उत्साह आणणारा आहे.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज लेहमधे सैनिकांबरोबर होळी साजरी केली. देशाच्या सीमांचं रक्षण करण्यासाठी सैनिक सज्ज असल्यामुळेच देशवासियांचं आयुष्य सुरक्षित असल्याचं ते म्हणाले. कर्तव्यपालनासाठी आपल्या कुटुंबापासून दूर राहणारे हे सैनिक प्रत्येक भारतीय कुटुम्बाचा भाग आहेत, असं

त्यांनी सांगितलं. संरक्षण मंत्री सियाचीन इथं सैनिकांबरोबर होळीचा सण साजरा करण्यासाठी जाणार होते मात्र खराब हवामानामुळे ते तिथे जाऊ शकले नाहीत. यावेळी त्यांनी लेहइथल्या समर स्मारकावर पुष्पचक्र अर्पण केलं.

<><><><><>

भारतीय भांडवल बाजारात परदेशी गुंतवणुकदारांच्या गुंतवणूकीत या महिन्यात लक्षणीय वाढ दिसून आली. फेब्रुवारीत १ हजार ५३९ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या पार्श्वभूमीवर, या महिन्यात भारतीय शेअर बाजारांमधे ३८ हजार कोटींची गुंतवणूक परदेशी गुंतवणूकदारांनी केली आहे. जागतिक बाजारातली सुधारणा  आणि भारतातल्या व्यापक  आर्थिक सुधारणांमुळे भारतातील संभाव्य तेजीकडे आकर्षित होत परदेशी गुंतवणूकदारांचा कल भारतात गुंतवणूक करण्याकडे असल्याचं दिसत आहे.

<><><><><>

योग्य वेळी घेतलेले धोरणात्मक निर्णय आणि आर्थिक सुधारणांमुळे देश कोविड संकटातून लवकर सावरला असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज बंगळुरु इथं थिंकर्स फोरम या संस्थेतर्फे आयोजित एका सत्रात बोलत होत्या. जागतिक समुदायानंही भारताच्या महामारीच्या काळातल्या कामाचं कौतुक केलं असल्याचही त्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

माजी हवाई दल प्रमुख आर के एस भदौरिया यांनी भरतीय जनता पार्टीत प्रवेश केला आहे. तिरुपतीचे आमदार वरप्रसाद राव वेलगापल्ली यांनीही भाजपात प्रवेश केला आहे. नवी दिल्लीच्या भाजपा मुख्यालयामधे केंद्रीय मंत्री अनुरागसिंग ठाकूर आणि ज्येष्ठ नेते विनोद तावडे यांनी या दोघांचं आज पक्षात स्वागत केलं.

**<><><><><>**

ईशान्य भारत, पश्चिम बंगालचा काही भाग आणि सिक्किममध्ये आजपासून मंगळवारपर्यंत वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. अरुणाचल प्रदेशाच्या बहुतेक भागामध्ये मध्यम स्वरुपाचा पाऊस आणि हिमवृष्टी होण्याचा अंदाजही विभागाने वर्तवला आहे. ईशान्य भागात बऱ्याच ठिकाणी कमाल तापमानात तीन ते चार अंश सेल्सिअसची घट होईल असा अंदाज हवामान विभागानं दिला आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज जयपूर इथं झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं लखनौ सुपर जायंट्सवर २० धावांनी विजय नोंदवला.

राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि निर्धारित २० षटकात ४ गडी गमावून १९३ धावा केल्या. कर्णधार संजू सॅमसननं नाबाद ८२, तर रियान परागनं ४३ धावा केल्या. यशस्वी जैस्वालनं २४, तर ध्रुव जुरेलनं नाबाद २० धावांचं योगदान दिलं.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना लखनौला २० षटकात ६ गडी गमावून १७३ धावाच करता आल्या. कर्णधार के एल राहुलनं ५८, तर निकोलस पुरननं नाबाद ६४ धावा केल्या. मात्र दीपक हुडाच्या २६ धावांचा अपवाद वगळता इतर फलंदाजांना विशेष कामगिरी करता आली नाही.

या स्पर्धेतला दुसरा सामना गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात अहमदाबाद इथं सुरु आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरात टायटन्सच्या ८ व्या षटकात २ बाद ६४ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

कलम ३७० ही भारतीय संविधानातली तात्पुरती तरतूद होती आणि ती सुरु ठेवणे देशासाठी हानीकारक होतं असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. सिंगापूर इथं भारतीयांशी संवाद साधताना जयशंकर यांनी ३७० कलमाचा वापर करत राहणं हे विभाजन, हिंसा आणि दहशतवादाला आमंत्रण देण्यासारखं होतं असं म्हटलं आहे.

भारत आणि रशिया यांच्यामधील संबध नेहमीच सकारात्मक राहिल्याचंही जयशंकर यावेळी म्हणाले. भारत आणि कोणत्याही देशांमधील संबधांकडे भारताने आपल्या दृष्टीकोनातून पहाणं गरजेचं आहे असंही मत जयशंकर यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या प्रचार समिती गठित करण्याच्या प्रस्तावाला काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी मंजुरी दिली आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे प्रचार समितीचे अध्यक्ष असून नाना पटो◌ेले, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, सुशिलकुमार शिंदे, मुकूल वासनिक यांच्यासह साठ सदस्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकासाठी, बिहारमधे संयुक्त जनता दलानं आपल्या १६ उमेदवारांची नावं आज जाहीर केली. त्यात बहुतांश विद्यमान खासदारांना पुन्हा संधी दिलेली आहे. मात्र सिवन लोकसभा मतदारसंघातून कविता सिंग, आणि सीतामढी मतदारसंघातून सुनील कुमार पिंटू या विद्यमान खासदारांना पक्षानं

उमेदवारी नाकारली आहे. सिवनमधून विजयलक्ष्मीदेवी आणि सितामढीमधून देवेश चंद्र ठाकूर या नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. ठाकूर हे सध्या बिहार विधानपरिषदेचे सभापती आहेत. माजी खासदार लवली आनंद यांना नव्यानं संधी मिळाली असून, त्या शिवहर मतदारसंघातून लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवतील.

<><><><>

राज्यसभेचे उपसभापती हरिवंश यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संसदीय शिष्टमंडळ स्वित्झर्लंडच्या जिनिव्हा इथं आंतर संसदीय संघाच्या 148 व्या सभेत सहभागी होत आहे. भारतीय शिष्टमंडळाने आंतर संसदीय संघ एशिया पॅसिफिक जिओ पॉलिटिकल ग्रुप, एपीजी ब्रिक्स संसदीय समन्वय मंच आणि महिला संसद सदस्यांच्या आंतर संसदीय संघाच्या मंचाच्या बैठकांना हजेरी लावली. थायलंडच्या संसदीय शिष्टमंडळाचीही भारतीय शिष्टमंडळाबरोबर द्विपक्षीय बैठक झाली.

<><><><>

मिझोराममधल्या मिझोमध्ये "तुमकाऊनी" म्हणून ओळखला जाणारा पाम संडे ख्रिस्ती धर्मियांकडून धार्मिक वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. राज्याच्या विविध भागांमध्ये पाम संडेच्या मिरवणुका काढण्यात आल्या. इस्रायलचा राजा म्हणून येशू ख्रिस्ताने जेरुसलेम मध्ये प्रवेश केला त्या दिवसाचे स्मरण म्हणून पाम संडे साजरा केला जातो. ईस्टर संडेच्या आधी एक आठवडा आणि गुड फ्रायडे पूर्वीचा हादिवस महत्त्वाचा मानला जातो. मिझोराममधल्या सर्व भागातल्या चर्चमध्ये पाम संडे सेवा आयोजित करण्यात आली होती.

<><><><>

राष्ट्रीय समाज पक्ष महायुती सोबतच राहणार असल्याचं पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी स्पष्ट केलं आहे. त्यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, यांची भेट घेत सविस्तर चर्चा केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे देखील यावेळी उपस्थित होते.

या बैठकीत जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पक्षाला लोकसभेची एक जागा देण्याचा निर्णय सुद्धा घेण्यात आला.

**<><><><><>**

शिवसेनेचे नेते आणि माजी मंत्री विजय शिवतारे यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवायचा निर्णय घेतला असून, येत्या १२ एप्रिलला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचं जाहीर केलं आहे. त्यांनी आज पुरंदरमधल्या प्रमुख कार्यकर्त्यांसोबत बैठक घेतली. त्यानंतर बातमीदारांशी बोलतांना, त्यांनी ही घोषणा केली.

**//<><><><><>//**